## रे.दिवाणी दावा क्र.२५०/२०१७ मधील निशाणी ३८ वरील आदेश.

(CNR No-MHST05000353-2017)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांनी वेळेत कैफीयत दिली नाही म्हणुन त्याचे विरुध्द 'विना कैफीयत' चा झालेला हुकूम रद्द होवुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

### अर्जातील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे –

२. सदरील प्रतिवादी यांना जुने कागदपत्रे, उतारे, फेरफार, वेळेत उपलब्ध झाले नाहीत. तसेच, सदर प्रतिवादी ही महिला असल्यामुळे मुदतीत कागदपत्रे जमा करणे व मे.कोर्टात हजर राहणे अशक्य झाल्यामुळे वेळेत कैफीयत देता आली नाही. त्यामुळे 'विना कैफीयत' चा झालेला हुकूम रद्द करुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी अर्जाखाली म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, अर्जातील नमुद कारण संयुक्तिक नाही. प्रस्तुतचे प्रकरण चौकशीवर असुन वादी यांचा पुरावा घेवुन त्यांचा पुरावा बंद केला असुन सुमारे ०१ वर्षानंतर प्रतिवादीस कैफीयत देता येणार नसल्याचे कथन करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. वैकल्पीकरित्या, प्रतिवादींचा अर्ज मंजुर करण्याचे मे.कोर्टाचे मत झाल्यास प्रतिवादीकडुन वादीस रक्कम रु.१०,०००/– खर्चाची मागणी केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रतिवादीस दि.२३/०८/२०१७ रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. प्रस्तुत अर्ज हा दि.२४/१०/२०१८

रोजी दाखल केला आहे. त्यामुळे अर्जास जवळ जवळ ०१ वर्षाचा विलंब झालेला आहे. प्रस्तुत दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला असुन मौल्यवान स्थावर मिळकती संदर्भात आहे. प्रतिवादी ही वाद मिळकतीत हक्क सांगत आहे. त्यामुळे, सदर दाव्यात दोन्ही पक्षकारांचे हितसंबंध असल्यामुळे प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवुन दावा गुणावगुणावर चालविणे न्यायोचित होईल. तसेच, प्रस्तुत प्रतिवादी यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास दाव्यांची पुर्नावृत्ती टाळता येईल. पण निश्चितच प्रतिवादी नं.२ हीस म्हणणे सादर करण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे, प्रतिवादी नं.२ वर रक्कम रुपये ५००/– खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

अर्ज (निशाणी ३८) रक्कम रुपये ५००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात आला.

कराड. (सौ.वि.प्र. गायकवाड )

दि. २४/१०/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड